**<u>पदवीधर शिक्षकांच्या ज्येष्ठतासुचीबाबत स्पष्टीकरण.....</u>**

**महाराष्ट्र शासन**
**शालेय शिक्षण व क्रीडा विभाग**
**शासन परिपत्रक क्रमांक:- संकीर्ण-२०१६/प्र.क्र.३२०/टीनटी-१**

हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा रोड,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक :१४ नोव्हेंबर, २०१७

<u>वाचा</u>:-

१) शासन परिपत्रक शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्र. वेतन-१२१६/प्र.क्र.१२३/१६/टीएनटी-३, दिनांक १३.१०.२०१६

२) शासन परिपत्रक शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्रमांक संकीर्ण-२०१६/प्र.क्र.३२०/टीएनटी-१, दिनांक २४.०१.२०१७

<u>प्रस्तावना</u>:-

पदवीधर शिक्षकांची ज्येष्ठता, याबाबतच्या ज्येष्ठता यादीमध्ये कोणत्या दिनांकापासून सूचित करण्यात यावी याबाबत मा. उच्च न्यायालय, नागपूर खंडपीठ यांनी याचिका क्रमांक २२८०/१९९७, २३५६/१९९७, ४०३५/२०१०, २३४९/२०११, ६२४४/२०११, ३०८१/२०१२, ४१८५/२०१२ सहीत इतर अनेक याचिका प्रकरणी दिलेल्या न्याय-निर्णयास अनुसरुन संदर्भाधिन शासन परिपत्रक दिनांक २४.०१.२०१७ अन्वये कार्यपध्दती विहित करण्यात आलेली आहे.

प्राथमिक स्तरावर (६ वी ते ८ वी) विज्ञान, भाषा आणि समाजशास्त्र या विषय संवर्गातील प्रत्येक विषयासाठी किमान एक याप्रमाणे तीन प्रशिक्षित पदवीधर शिक्षकांची नेमणुक करणे आवश्यक आहे. त्यानुसार प्रशिक्षित पदवीधर शिक्षकांची ज्येष्ठता सूची, विषय-संवर्गनिहाय ठेवणे आवश्यक आहे. तसेच मा. सर्वोच्च न्यायालयाने सिव्हील अपील क्रमांक ७६९९/२०१४ यामध्ये दिनांक १३.०८.२०१४ रोजी दिलेल्या न्याय-निर्णयान्वये सेवाज्येष्ठतेबाबत कोणते निकष विचारात घेण्यात यावेत याबाबत निर्देशित केलेले आहे. तथापि, पदवीधर शिक्षकांची ज्येष्ठतासूची तसेच पदोन्नतीबाबतची ज्येष्ठतासूची या दोन्ही ज्येष्ठतासूची तयार करताना क्षेत्रिय अधिकाऱ्यांमध्ये तसेच विविध संघटनांकडून प्राप्त झालेल्या निवेदनाद्वारे अद्याप संभ्रम असल्याचे निदर्शनास आल्याने तसेच दिनांक २४.०१.२०१७ च्या सूचना इयत्ता “६ वी ते ८ वी” करीताच मर्यादित आहेत किंवा कसे, याबाबत खुलासा करणे आवश्यक असल्याने त्याबाबत सुस्पष्ट स्पष्टीकरण करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन परिपत्रक:-**

पदवीधर शिक्षकांच्या ज्येष्ठतासूचीबाबत शासन परिपत्रक दिनांक १३.१०.२०१६ तसेच दिनांक २४.०१.२०१७ मधील सूचनांसह खालील बाबी सदर पदवीधर शिक्षक ज्येष्ठतासूची तसेच सामाईक ज्येष्ठता सूची याकरीता विचारात घेण्यात याव्यात:-

१. पदवीधर ज्येष्ठतासूची ही संबंधित शिक्षकास पदवीधर वेतनश्रेणी मान्य करण्याकरीता विचारात घेण्यात यावी.

२. सामाईक ज्येष्ठतासूची ही पदोन्नतीच्या प्रयोजनार्थ विचारात घेण्यात यावी.

३. पदवी मान्यता बी.ए. /बी.कॉम/बी.एससी ही शैक्षणिक स्वरुपाची पदवी असून प्राथमिक शिक्षक पदाकरीता आवश्यक असलेल्या मूळ अर्हतेशिवाय त्या-त्या पदासाठीची अधिकची अर्हता आहे.

४. पदवी प्राप्त केल्यानंतर संबंधित शिक्षकाचा पदवीधर शिक्षकांच्या यादीमध्ये समावेश होईल. सदर यादीतील त्याचा ज्येष्ठतेचा दिनांक हा अखंड सेवेतील शिक्षक पदावरील प्रथम नियुक्तीचा जो दिनांक असेल, तो दिनांक राहील.

५. शिक्षक संवर्गात प्रथम नियुक्ती दिनांक व अखंड सेवा विचारात घेवून तयार करण्यात आलेली सामाईक ज्येष्ठतासूची पदोन्नतीकरीता विचारात घेण्यात यावी व पदोन्नतीच्या पदाकरीता आवश्यक असणारी शैक्षणिक व व्यावसायिक अर्हता अनुभवाच्या अटीसह पदोन्नतीच्या वेळेस संबंधित शिक्षक धारण करीत असेल तर, पदोन्नतीच्या पदासाठी संबंधित शिक्षकाचा विचार करावा.

६. महाराष्ट्र खाजगी शाळेतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) नियमावली, १९८१ मधील नियम १२ अनुसूची-फ मधील तरतूदीनुसार प्रवर्ग "क" मध्ये अंतर्भाव होण्यासाठी संबंधित शिक्षकाने सदर प्रवर्गाकरीता विहित केलेली अर्हता धारण करणे आवश्यक राहील. [उदा. एस.टी.सी./ डीप.एड. (एक वर्षाचा अभ्यासक्रम) किंवा तत्सम व्यावसायिक अर्हताधारक शिक्षकांचा अंतर्भाव प्रवर्ग "क" मध्ये होण्यासाठी त्या शिक्षकाची सेवा किमान १० वर्ष झालेली असणे आवश्यक राहील.]

७. पदोन्नतीकरीता विचारात घ्यावयाची सामाईक ज्येष्ठतासूची ही उच्च प्राथमिक स्तराबरोबरच (इयत्ता ६ वी ते ८ वी ) माध्यमिक (इयता ९ वी ते १० वी) तसेच उच्च माध्यमिक (इयत्ता ११ वी ते १२ वी) स्तरांकरिताही विचारात घेण्यात यावी.

हे शासन परिपत्रक शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक क्रमांक २०१७१११४१७३०१४१३२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Sanjay Dattatray Mane

Digitally signed by Sanjay Dattatray Mane
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=School Education And Sports Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=5938dfcf55dfa4d20c3c2b25ee54999d774aedb59d71b14cfc2860776279ef16, serialNumber=cc816238ed3c914e2fa2e99da4bc0ba4e1f6947aa23ad145e3dc6a469041090f, cn=Sanjay Dattatray Mane
Date: 2017.11.14 17:33:54 +05'30'

**( सं.द. माने )**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१) आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे.
२) संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.
३) संचालक (प्राथमिक) महाराष्ट्र राज्य, पुणे.
४) विभागीय शिक्षण उपसंचालक (सर्व)
५) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, (सर्व)
६) सर्व शिक्षणाधिकारी (प्राथमिक / माध्यमिक व उच्च माध्यमिक).
७) निवड नस्ती (टिएनटी-१)